नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक:१५/०५/२०२६

पुणे महानगरपालिका
मा. स्थायी समिती
कार्यपत्रिका क्र.८

मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा **गुरुवार, दि.२१/०५/२०२६ रोजी, सकाळी ११:३० (अकरा वाजून तीस मिनिटे) वाजता मा.स्थायी समिती सभागृह , दुसरा मजला, पुणे महानगरपालिका (नवीन विस्तारित इमारत) येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

उपआयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

विषय क्र. २००

उप आयुक्त परिमंडळ क्र.५ कार्यालयाचे नियंत्रणखालील क्षेत्रीय कार्यालयांकडील १४ मुद्यांबाबतची माहे मार्च २०२६ ची माहिती निदर्शनास आणणेबाबत.मा.अति. महापालिका आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.५/८९ दिनांक १३/०५/२०२६ रोजीचे पत्र.

माहितीसाठी आलेले विषय

विषय क्र. २०१

उप आयुक्त, परिमंडळ क्र.५ यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१६/०२/२०२६ ते दि.२८/०२/२०२६ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (ड) नुसार मा. अति. महा. आयुक्त (इ) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा.अति.महा. आयुक्त (इ) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.५/७३, दि.०५/०५/२०२६ चे पत्र.

विषय क्र. २०२

उप आयुक्त, परिमंडळ क्र.५ यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.०१/०३/२०२६ ते दि.१५/०३/२०२६ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (ड) नुसार मा. अति. महा. आयुक्त (इ) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा.अति.महा. आयुक्त (इ) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.५/८६, दि.१२/०५/२०२६ चे पत्र.

विषय क्र. २०३

उप आयुक्त, परिमंडळ क्र.५ यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१६/०३/२०२६ ते दि.३१/०३/२०२६ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (ड) नुसार मा. अति. महा. आयुक्त (इ) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा.अति.महा. आयुक्त (इ) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.५/८७, दि.१२/०५/२०२६ चे पत्र.

विषय क्र.२०४

दिनांक १३/०४/२०२६ ते १९/०४/२०२६ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण ९४ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/७४, दि.०५/०५/२०२६ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

विषय क्र.२०५

दिनांक २०/०४/२०२६ ते २६/०४/२०२६ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण ७९ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/८४, दि.०८/०५/२०२६ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

मा.सभासदांचे प्रस्ताव

विषय क्र.२०६

मा.निलेश निकम व मा. दत्ता धनकवडे यांचे दि.१२/०५/२०२६ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील वृक्षगणना करणे कामी प्रशासनाने में सारा आय.टी या कंपनीला २९.८७ कोटी रुपयाची निविदा मान्यतेसाठी चे विषयपत्र तयार केले आहे. पुणे शहरातील वृक्षगणना २०१७ या आर्थिक वर्षात सुरु करून २०२४ या साली पूर्ण झालेली आहे. त्या गणनेनुसार पुणे शहरात ५८ लाख वृक्ष आहेत. तसेच २०१७ ते २०२६ या कालवधीत किती वृक्ष काढण्यासाठी परवानगी दिली याच्या सर्व नोंदी वृक्ष प्राधिकरण विभागाकडे उपलब्ध आहेत. तसेच या कालवधीत नव्याने केलेल्या वृक्ष लागवडीच्या नोंदी सुध्दा या विभागाकडे उपलब्ध आहेत. त्यामुळे फक्त २०१७ नंतर नव्याने समाविष्ठ झालेल्या गावांतील वृक्षगणना करावी.

मे सारा आय.टी या कंपनीने मिळकतकर विभागाने जी आय, एस मॅपिंगचे कामामध्ये ८८% चुका केल्या आहेत तसेच या कंपनीच्या २ कर्मचारी यांच्या वर बनावट स्वाक्षरी प्रकरणी मनपाने गुन्हा दाखल केलेला आहे व कंपनीला ब्लॅक लिस्ट करून त्यांचे १२.०० कोटी रुपये जप्त केलेले आहेत. या बाबींचा विचार करून मे. सारा आय.टी कंपनीची वृक्षगणनेची निविदा रद्द करून फक्त नव्याने समाविष्ठ गावांसाठी वृक्षगणना करणे कामी नव्याने निविदा मागविण्यात यावी.

सेवक वर्गाची प्रकरणे

विषय क्र.२०७

नगररोड वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयाकडील श्री. संतोष शांतीलाल वाल्हेकर – सफाई सेवक यांचे निलंबन प्रकरणी मनपा सेवाविनियम क्र. ५८ नुसार दि.३१/१२/२०२५ रोजी सातवी सहामाही पूर्ण होत असल्याची बाब निदर्शनास आणणेबाबत. मा.अति. महापालिका आयुक्त (इ) यांचे जा. क्र.मआ/साप्र/८५ दिनांक ०८/०५/२०२६ रोजीचे पत्र.

सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

विषय क्र.२०८

प्रभाग क्रमांक १९ मध्ये बाफना मोटर्स काशेवाडी १० नं. कॉलनी परिसरात व बीएसएनएल ऑफिस पर्यंत रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे SHREE BHAVANI CONSTRUCTION यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.५२५७२६११/- पेक्षा २.०१% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५१५१५९०१=५२ अधिक जी.एस.टी.

र.रु.९२७२८६२/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.४५१३८४/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.४७१७००/- पर्यंत अशी एकुण र.रु.६१७११८४७=५२ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/८८, दि.१३/०५/२०२६ चे पत्र.

मागील सभेचे विषय

विषय क्र.२०९

३ ते ४ वर्षांची रोपे लागवडीकरिता पुरविणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. जय गणेश डेव्हलपर्स यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.५९९९९४६/- पेक्षा ६.६६% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु ५६००३४९=६० उपलब्ध रकमे पर्यंत (हॉर्टीकल्चर विषयक देखभाल दुरुस्तीची काम असल्याने भाववाढ सूत्र वगळून काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत. मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/उद्यान/११, दि. ०८/०४/२०२६ चे पत्र.

(टीप:- सदर विषयाचा विचार एक (१) महिना नंतर करण्यात यावा, असे दि. १६/०४/२०२६ च्या सभेत ठरले होते.)

संकीर्ण

विषय क्र.२१०

प्रभाग क्र.३१ मधील स.नं. ९ कर्वे नगर मधील प्ले ग्राउंड आरक्षित जागेवर अर्चरीचे मैदान विकसित करणे, या कामासाठी चालू वर्षातील ८२.५० लक्ष व्यतिरिक्त पुढील सन २०२७-२८ मध्ये रक्कम रुपये ४९२.५० लक्ष (स्थापत्य व विद्युत कामासाठी) पर्यंत अंदाजपत्रकीय तरतूद उपलब्ध करणे त्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चाचे दायीत्व स्विकारण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील १९४९ चे कलम ७२ (ब) अन्वये मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभा यांची मान्यता मिळणेबाबत. मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन /१०५, दि. १४/५/२०२६ चे पत्र.

नगरसचिव
पुणे महानगरपालिका

(टीप : प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेट्स) मा. नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)